सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
विद्यार्थी विकास मंडळ
गणेशखिंड, पुणे – ४११ ००७.


डॉ. सविता कुलकर्णी
संचालक (अतिरिक्त कार्यभार)


संदर्भ क्र. विविमं/२०२५–२६/८९३ दिनांक : १३/०५/२०२६

प्रति,

**मा. प्राचार्य/मा. संचालक/मा. विभागप्रमुख,**
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्नित **(फक्त पुणे जिल्हा)**
सर्व महाविद्यालये व परिसंस्था,
विद्यापीठ परिसरातील सर्व शैक्षणिक विभाग.

**विषय** : स्वच्छ सर्वेक्षण २०२५–२६ च्या अनुषंगाने सिटीझन्स फीडबॅक नोंदविणेबाबत.
**संदर्भ** : उप आयुक्त कार्यालय घनकचरा व्यवस्थापन पुणे महानगर पालिका यांचे जावक क्र. घनव्यका/४२७ दिनांक २७/०४/२०२६ चे पत्र

महोदय/महोदया,

उपरोक्त संदर्भीय पत्रान्वये आपणास कळविण्यात येते की, स्वच्छ भारत अभियान अंतर्गत स्वच्छ सर्वेक्षण २०२५–२६ ची सुरवात झाली असून सर्वेक्षण २०२५–२६ चे सविस्तर टूलकीट जाहीर करण्यात आलेले आहे.

स्वच्छ सर्वेक्षण २०२५–२६ अंतर्गत शहरातील स्वच्छता विषयक कामकाजाची सातत्यता तपासण्याकरिता शासनाने काही निकष निश्चित केले आहेत व यांना गुणांकन देण्यात आले आहे. त्या अनुषंगाने आपल्या महाविद्यालयातील सर्व विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांना SS2025-26 CITIZEN’S FEEDBACK द्वारे शहराविषयी सकारात्मक प्रतिक्रिया नोंदविण्याच्या सूचना देण्यात याव्यात. या संबंधीचे सविस्तर पत्र आपल्या माहितीसाठी व उचित कार्यवाहीसाठी सोबत जोडले आहे.

तरी आपल्या महाविद्यालयातील सर्व विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांचेमार्फत जास्तीत जास्त सकारात्मक अभिप्राय नोंदवून त्याचा अहवाल swmdata@punecorporation.org या संकेतस्थळावर पाठविण्यात यावे. तसेच आपल्या महाविद्यालय/परिसंस्था/विभागातील मुख्य सूचना फलकावर सदर पत्र प्रदर्शित करुन विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्या निदर्शनास आणून देण्याबाबत संबंधितास सूचित करावे, कळावे ही विनंती.

सोबत : वरीलप्रमाणे

(डॉ. सविता कुलकर्णी)
संचालक, (अतिरिक्त कार्यभार)
विद्यार्थी विकास मंडळ

उप आयुक्त कार्यालय
घनकचरा व्यवस्थापन
पुणेमहानगरपालिका
जावकक्र. :- घकव्यका/४२७
दिनांक :- २७/०४/२०२६

प्रति,
मा.कुलगुरू
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
पुणे

विद्यार्थी विकास मंडळ आवक क्र. 7167 08 MAY 2026

**विषय :- स्वच्छ सर्वेक्षण २०२५-२६ च्या अनुषंगाने सिटीझन्स फीडबॅक नोंदविणेबाबत.**

स्वच्छ भारत अभियान अंतर्गत स्वच्छ सर्वेक्षण २०२५-२६ ची सुरवात झाली असून सर्वेक्षण २०२५-२६ चे सविस्तर नवीन टूलकीट जाहीर करण्यात आलेले आहे.

स्वच्छ सर्वेक्षण २०२५-२६ अंतर्गत शहरातील स्वच्छता विषयक कामकाजाची सातत्यता तपासण्याकरीता शासनाने काही निकष निश्चित केले आहेत व यांना गुणांकन देण्यात आले आहे. त्या अनुषंगाने आपले शाळा/महाविद्यालयातील सर्व विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांना SS2025-26 CITIZEN'S FEEDBACK द्वारे शहराविषयी सकारात्मक प्रतिक्रिया नोंदविण्याच्या सुचना देण्यात याव्यात. तसेच विद्यार्थ्यांचे कुटुंबीय, मित्र वर्ग यांना याबाबत माहिती देऊन जास्तीत जास्त सकारात्मक प्रतिक्रिया प्राप्त करावयाच्या आहेत.

स्वच्छ सर्वेक्षण २०२५-२६ च्या थेट परीक्षणाच्या वेळी यांच नागरिकांकी ठराविक नागरिकास मे.केंद्र सरकारकडून फोन कॉल्स येऊ शकतील याची माहिती संबंधीतांस द्यावी. प्रतिक्रिया देण्याकरीता वेबसाईटद्वारे अथवा QR Code द्वारे अभिप्राय देऊ शकतो त्यासाठीची सविस्तर कार्यपद्धती पुढीलप्रमाणे आहे.

- वेब साईट द्वारे प्रतिक्रिया देण्याची पद्धती:

(SWACHH SURVEKSHAN 2025 CITIZEN'S FEEDBACK)

https://cf.sbmurban.org/

↓

नागरिकांचा अभिप्राय

↓

भाषा निवडा

↓

मोबाईल नंबर टाका

↓

प्रश्नांची उत्तरे द्या.

↓

आलेला OTP टाकून अभिप्राय सबमिट करा.

मा. कुलगुरू यांचे कार्यालय
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
आवक दिनांक 05 MAY 2026
आवक क्रमांक व्हीसी 2432
जावक दिनांक

मा. कुलसचिव यांचे कार्यालय
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
टिपणी क्रमांक आर/ 2672
आवक दिनांक 7-5-26
जावक दिनांक 8-5-26

Registrar

Dir. BSD

- Vote for your city QR Code :- सोबत जोडण्यात आलेल्या सादरीकरणामध्ये दिलेला QR code स्कॅन करून दिलेल्या प्रश्नांची उत्तरे देऊन आपला अभिप्राय नोंदवावा.

तरी आपले शाळा/महाविद्यालयातील सर्व विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांचेमार्फत जास्तीत जास्त सकारात्मक अभिप्राय नोंदवून त्याचा अहवाल swmdata@punecorporation.org या संकेतस्थळावर पाठविण्यात यावा.

कळावे.

SSVarule 27/4/26

(संतोष वारुळे)
उप आयुक्त
घनकचरा व्यवस्थापन
पुणे महानगरपालिका

on website for colleges